


महाराष्ट्र शासन

ग्रामविकास विभाग

माझं गाव माझी मातृभूमी

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

**आढावा बैठक दि. २४/१२/२०२५**

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान – ग्रामस्तरीय अंमलबजावणी

## जिल्हास्तरीय वॉर-रूमची स्थापना व पर्यवेक्षण

मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) व गट विकास अधिकारी यांनी अनुक्रमे जिल्हास्तरीय व तालुका स्तरीय **War Room चा अधिक व्यापक स्वरूपात उपयोग करून** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचे सातत्यपूर्ण निरीक्षण व पुनरावलोकन करावे. सर्व तांत्रिक, प्रशासकीय,प्रगतीसंबंधित व प्रचर-प्रसिद्धी समन्वय या केंद्राद्वारे सुनिश्चित करावा.

## सन २०२५-२६ आर्थिक वर्षातील स्पर्धेकरिता २०% ग्रामपंचायतींची निवड व संपर्क अधिकाऱ्यांची नेमणूक

प्रत्येक ब्लॉकमधून **20% गावे ओळखून** त्यांची स्वतंत्र सूची तयार करावी. राज्यस्तरावरून उपलब्ध करून देण्यात आलेल्या Google Spreadsheet मध्ये याबाबत माहिती भरावी. ग्रामपंचायतींमध्ये अभियानाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी विशेष लक्ष द्यावे. या कार्यासाठी **विस्तार अधिकारी यांची गावांसाठी संपर्क अधिकारी म्हणून नेमणूक** करावी.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान – ग्रामस्तरीय अंमलबजावणी

**गट विकास अधिकारी यांनी साप्ताहिक आढावा बैठक घेणे अनिवार्य राहील, ब्लॉकस्तरीय Action Plan तयार करून त्याची सुयोग्य व प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करावी**

गट विकास अधिकारी यांनी दर आठवड्याला किमान **10** गावांना प्रत्यक्ष भेट देऊन अभियान प्रगतीचा आढावा घ्यावा व अभियानाच्या घटकापैकी किमान एका घटकाच्या अंमलबजावणी बाबत ग्रामस्थानासहकार्य करावे. तसेच, अभियानाच्या प्रगतीसंदर्भातील सविस्तर लेखी अहवाल तयार करून तो मुख्य कार्यकारी अधिकारी **(CEO)** यांना नियमितरित्या सादर करावा.

या भेटीत केलेल्या कृतीची नोंदही ऑनलाइन पोर्टलवर, प्रचार प्रसार माध्यमांवर करावी.

**गावभेट व प्रत्यक्ष निरीक्षण**

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी साप्ताहिक किमान 5 गावांची प्रत्यक्ष भेट घेऊन प्रगतीचे निरीक्षण करावे तसेच आवश्यक त्या सूचनांचा अहवाल लेखी स्वरूपात घ्यावा.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान – ग्रामस्तरीय अंमलबजावणी

## नाविन्यपूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन

शासन निर्णयानुसार गावात नाविन्यपूर्ण कल्पना किंवा उपक्रम राबवले जात आहेत हे पाहावे व त्यांना प्रोत्साहन, आवश्यक मदत करावी, तसेच याबाबत चांगल्या प्रकारे प्रसार व प्रसिद्धी करावी

## सोशल मीडियावरील अभियान प्रसार व राज्यस्तरीय समन्वय

सर्व CEO व BDO यांनी जिल्हा परिषद, पंचायत समिती किंवा ग्रामपंचायतींच्या अधिकृत सोशल मीडिया खात्यांद्वारे अभियानाची प्रगती, उपक्रम आणि यशोगाथा नियमितपणे प्रसारित कराव्यात तसेच, राज्यस्तरीय ग्राम विकास विभागाच्या अधिकृत Instagram हँडलशी **Collaboration** साधून संयुक्त पोस्ट/रील्स प्रकाशित कराव्यात.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान – ऑनलाईन मॉनिटरिंग व स्पर्धा

**1. पूर्व प्रश्नावली (Pre-Questionnaire)**

अभियानाची सुरुवात होण्यापूर्वीची सद्यस्थिती (Baseline) समजून घेण्यासाठी ही प्रणाली कार्यान्वित करण्यात आली असून, तिच्या माध्यमातून उत्कृष्ट व व्यापक प्रतिसाद प्राप्त झाला आहे.

**2. रिअल टाइम प्रगती मॉनिटरिंग प्रश्नावली (Real Time Progress Monitoring Report)**

या प्रश्नावलीचा उद्देश अभियानाच्या कालावधीत सुरू असलेली प्रगती (Live Progress) फक्त ट्रॅक करणे इतकाच असून,या प्रश्नावलीसाठी कोणतेही गुण (Marks) देण्यात येणार नाहीत, तसेच हा डेटा पुढील मूल्यांकन अथवा स्पर्धेसाठी वापरण्यात येणार नाही.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान – ऑनलाईन मॉनिटरिंग व स्पर्धा

## 3. मुख्य प्रश्नावली (Main Questionnaire)

ही प्रश्नावली अभियानातील सर्वात महत्त्वाचा घटक असून,

- याच प्रश्नावलीच्या माध्यमातून खरी स्पर्धा (Competition) आयोजित करण्यात येईल,
- ग्रामपंचायतींना गुण (Marks) प्रदान करण्यात येतील,
- तसेच याच गुणांच्या आधारे उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींची निवड करून बक्षिसांसाठी पात्रता निश्चित केली जाईल.

## 3. उद्दिष्ट साध्य प्रश्नावली (Outcome / Achievement Questionnaire)

- संपूर्ण अभियान कालावधीत झालेली एकूण प्रगती 'Before & After' पद्धतीने मोजण्यात येणार असून, हे मूल्यांकन पूर्णपणे पूर्व प्रश्नावली (Pre-Questionnaire) व उद्दिष्ट साध्य प्रश्नावली या दोन प्रश्नावलींमध्ये नोंदविलेल्या माहितीच्या आधारे करण्यात येईल.
- ज्याच्या आधारे अभियानाची यशस्वी अंमलबजावणी व प्रत्यक्ष परिणाम (Impact Assessment) मोजण्यात येतील.

# सध्याची स्थिती

| एकूण ग्रामपंचायत | पूर्व प्रश्नावली | पूर्वप्रश्नावली शिल्लक |
|---|---|---|
| २७९६० | २७६५४ | ३०६ |

सर्व संबंधित बीडीओ व मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) यांच्यासाठी आवश्यक **लॉगिन (Credentials)** तयार करून वितरित करण्यात आले आहेत.

**पूर्व प्रश्नावली (Pre-Questionnaire)** प्रणाली कार्यान्वित करण्यात आली असून तिच्या संदर्भातील उत्कृष्ट प्रतिसाद प्राप्त झाला आहे. प्राप्त प्रतिसादाच्या आधारे आवश्यक अद्ययावतही करण्यात आलेली आहेत.

**प्रोफाईल व पूर्व प्रश्नावली भरण्याच्या प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये**, यासाठी सविस्तर **मार्गदर्शक पुस्तिका** तयार करून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रकल्पाच्या अमलबजावणी दरम्यान **मोबाईल कॉलद्वारे सातत्याने तांत्रिक सहाय्य तसेच मार्गदर्शन** प्रदान करण्यात येत आहे.

# सध्याची स्थिती

आतापर्यंत आम्ही उपलब्ध करून दिलेली सर्व माहिती **अधिकृत संकेतस्थळावर (Official Website)** प्रसारित करण्यात आलेली आहे.

CEO व BDO स्तरावरील अधिकाऱ्यांसाठी **स्वतंत्र डॅशबोर्डची सुविधा** उपलब्ध असून त्यामध्ये अद्ययावत माहितीचे **रिअल-टाईम अहवाल (Real-time Reports)** पाहण्याची सोय करण्यात आलेली आहे.

मुख्य प्रश्नावलीतील ८ **सर्वेक्षण फॉर्मची प्रक्रिया सध्या Testing Stage** मध्ये असून तो फॉर्म **लवकरच उपलब्ध होणार आहे**.

मोबाईल ॲप्लिकेशन द्वारे फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध होणार असून, संबंधित मोबाईल ॲप्लिकेशन लवकरच सुरू करण्यात **येईल**.

सूचना पुस्तिका

- प्रत्येक फॉर्मचा( 8 मुख्य प्रश्नावली) व्हिडिओ तयार करण्याची आणि त्यासंबंधी सूचनापुस्तिका तयार केली जाईल.

**तांत्रिक सहाय्यसाठी संपर्क**

- देवेंद्र पाटील – 7066505650
- सुमित वाघधरे – 9029876488
- जयश्री माळी – 7841878555

# प्रचार व प्रसार पथक समन्वयाबाबत महत्त्वाचे निर्देश

**प्रचार व प्रसार पथकाच्या ग्रामस्तर भेटीदरम्यान** संबंधित सरपंच, बीडीओ, ग्रामसेवक तसेच विस्तार अधिकारी यांनी पथकास आवश्यक त्या सर्व **अनुमती, परवानग्या व प्रशासकीय सहकार्य** उपलब्ध करून द्यावे.

**सोशल मीडिया कंटेंट निर्मिती / व्हिडिओ शूट** यांसंबंधित सर्व सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून संबंधित पदाधिकाऱ्यांपर्यंत वेळेत **अचूकपणे पोहोचवणे.**

व्हिडिओ शूट किंवा अन्य प्रसार उपक्रमाचे **नियोजन निश्चित करण्यात आल्यानंतर**, नियोजित दिवशी ग्रामपंचायत / पंचायत समिती / जिल्हा परिषद स्तरावरील **संबंधित अधिकारी वेळेत उपस्थित राहावे व आवश्यक ते सहकार्य व सुविधा पुरवाव्यात.**

तसेच, प्रचार व प्रसार पथकाच्या कामकाजात कोणतीही **अडथळा किंवा विलंब होणार नाही** याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान गीत

मुख्यमंत्री
समृद्ध पंचायतराज अभियान

**खालील तीन अभियान गीतांचे अधिकृत लोकार्पण पूर्ण झालेले आहे.**

नव्या उद्याची नवी उभारी **( Released)**

माझं गाव, माझी मायभूमी

तुझ्या साथीला, तुझ्या मदतीला, तुझच सरकार आल

## ♫ आपले अभियान. आपले गीत. आपली जबाबदारी.

- रील्स व व्हिडिओ तयार करताना सर्वांनी अधिकृत अभियान गीताचा वापर करावा, अशी विनंती आहे.
  हे गीत आपल्या अभियानाची भावना दर्शवते — हीच आपली ओळख, आपला आवाज आणि आपला संदेश आहे.
- गाव, तालुका, जिल्हा तसेच राज्यभर हे गीत सातत्याने वापरून त्याला लोकप्रिय करत अभियानाबाबत मालकीभाव आणि अभिमान निर्माण करूया.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान गीत

**सर्व अधिकारी महोदय/महोदया यांना विनंती**

- मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाबाबत जनजागृती करण्यासाठी ग्रामीण विकास विभागाच्या अधिकृत Instagram चॅनेलवर नियमितपणे जनजागृती रील्स पोस्ट करण्यात येत आहेत तसेच त्या रील्सचे डाउनलोड केलेले व्हर्जन्स या ग्रुपवरही शेअर करण्यात येत आहेत.
- सदर रील्स आपल्या संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या ग्रुप्समध्ये शेअर करण्यात याव्यात तसेच विशेषतः ग्रामसेवक व सरपंच यांनी त्या त्यांच्या WhatsApp Status वर ठेवण्याबाबत सर्वांना विनंती करावी, जेणेकरून व्यापक जनजागृती होईल.

**उद्दिष्ट:**

सामान्य व लोकप्रिय माध्यमाद्वारे गावपातळीवर अभियानाच्या संदेशाचा जास्तीत जास्त प्रसार करणे.

- आपल्या सहकार्यामुळे सर्व ग्रामपंचायतींमध्ये अभियानाचा एकसारखा संदेश पोहोचेल, व्यापक दृश्यमानता निर्माण होईल. यामुळे चांगल्या कामाची दखल घेतली जाईल, सकारात्मक स्पर्धा निर्माण होईल आणि ग्रामपंचायतींना अभियानात सक्रिय सहभाग घेण्याची प्रेरणा मिळेल

# जिल्हा परिषद स्तरावरील सोशल मीडिया अंमलबजावणी

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

- सर्व जिल्हा परिषदांनी (ZP) Instagram, Facebook व YouTube ही अधिकृत सोशल मीडिया चॅनेल्स कार्यान्वित ठेवून त्यावर नियमित अद्ययावत (Updates) देणे बंधनकारक राहील व अभियानाचा प्रचार-प्रसिद्धीसाठी त्यांचा प्रभावी वापर करण्यात यावा.
- अभियान गीताचा वापर करून Reels, Shorts व व्हिडिओ तयार करून ते संबंधित जिल्हा परिषद / पंचायत समितीच्या अधिकृत सोशल मीडिया पेजवर शेअर करणे आवश्यक आहे.
- सध्या अनेक जिल्हा परिषदांचे सोशल मीडिया अकाउंट्स अस्तित्वात असूनही नियमित अपडेट्स दिसून येत नाहीत, तर काही जिल्ह्यांमध्ये सोशल मीडिया उपस्थितीच उपलब्ध नाही — यामध्ये तातडीने सुधारणा करणे आवश्यक आहे.
- अभियान कालावधीत सर्व CEO व BDO यांनी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींच्या अधिकृत सोशल मीडिया खात्यांद्वारे अभियानाची प्रगती, उपक्रम व यशोगाथा नियमितपणे प्रसारित कराव्यात तसेच राज्यस्तरीय ग्राम विकास विभागाच्या अधिकृत Instagram हँडलशी Collaboration करून संयुक्त पोस्ट/रील्स प्रसिद्ध कराव्यात.

# “प्रचार व प्रसिद्धीसाठी सेलिब्रिटी भेटीचे नियोजन”

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

- अभियानाच्या राज्यस्तरीय प्रचार व प्रसिद्धीसाठी सेलिब्रिटी भेटीचे नियोजन करण्यात आलेले असून, सर्व सीईओ यांनी सेलिब्रिटी भेटी व कार्यक्रम आयोजित होणाऱ्या ग्रामपंचायतींची यादी पूर्वीच निश्चित करून सादर करावी.
- संबंधित सीईओ यांना कार्यक्रमासाठी सेलिब्रिटी भेटीचे नियोजन किमान ८ दिवस पूर्वसूचनेसह कळविण्यात येईल.
- संबंधित ग्रामपंचायतीने कार्यक्रमासाठी आवश्यक असलेली जागा, मंच (Stage), स्क्रीन तसेच इतर आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.
- प्रचार व प्रसिद्धी अंतर्गत सेलिब्रिटींसाठी स्किट, एकपात्री/एकल नाट्य, शो, शाळा भेट इत्यादी उपक्रमांचे आयोजन करता येईल.
- शासन निर्णयानुसार (GR) नमूद केलेल्या उपक्रमांपैकी किमान एक उपक्रम सेलिब्रिटीद्वारे प्रत्यक्ष करावा
- सर्व उपक्रमांच्या माध्यमातून अभियानाचा संदेश प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचेल यासाठी समन्वयाने व परिणामकारक अंमलबजावणी करण्यात यावी.

मुख्यमंत्री
समृद्ध पंचायतराज अभियान

# धन्यवाद